Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

23 March 2019, Special Issue- 168 (II)

# Globalisation : Challenges and Opportunities for India

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Shivaji Dalnar
Principal
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Rameshwargaon, Tq. Gangakhed, Dist. Parbhani

**Co-Editor**
Dr. [illegible] R.Y.
Dept. of Economics
PAH Mahavidyalaya, Rameshwargaon, Tq. Gangakhed, Dist. Parbhani

Prof. [illegible] V.B.
Dept. of Political Science
PAH Mahavidyalaya, Rameshwargaon, Tq. Gangakhed, Dist. Parbhani

RESEARCH JOURNEY

RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

# Index


1. महिला सशक्तिकरण और ग्रामीण विकास — 11
डॉ.सुनीता श्रीवास्तव
2. विमुद्रीकरण का बेरोजगारी पर हुआ असर एक अध्ययन — 14
प्रा. डॉ. सुर्यकांत पवार
3. भारतीय नक्षलवाद — 16
प्रा. डॉ. सिद्धेश्वर शेटकर
4. "भारतातील नक्षलवाद" — 18
कु. पुजा कमलाकर तिप्पणबोने
5. जागतिकीकरणाचे भारताच्या राजकीय व्यवस्थेवरील परिणाम — 20
सुभाष पोले
6. वाढता दहशतवाद : भारतीय सुरक्षा व्यवस्थे समोरील एक प्रमुख अव्हान — २३
प्रा. सोनवणे जी.एन
7. जागतिकीकरण आणि उच्च शिक्षणापुढील आव्हाने — 25
प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर
8. योगातुन आरोग्याकडे — 27
डॉ. फड एल. एच.
9. "जागतिकीकरण आणि राष्ट्रीय सुरक्षेपुढील आव्हाने" — 31
डॉ. बी. डी. तोडकर
10. 'जागतिकीकरण' वास्तव आणि अपरिहार्यता — 35
डॉ.भुजंग विठ्ठलराव पाटील
11. भारतातील दहशतवाद — ३८
गडदरे आनंदा बबन
12. "जागतिकीकरण आणि भारतीय संस्कृती" — ४०
भिकाणे शोभा राजेंद्र
13. भारतातील शेतकरी आत्महत्या कारणे आणि उपाय — 43
प्रा.डॉ. शिवाजी पाते
14. जागतिकिकरण आणि ई–बुक्स — 46
संतोष किर्तनकार
15. जागतिकीकरण आणि सामाजिक समस्या : एक विश्लेषण — 49
प्रा. डॉ. आनेराव एम. एम.
16. जागतिकीकरण आणि दारिद्र्य : एक अभ्यास — 52
दलित सुभाषराव कांबळे , प्रा.डॉ. दिपक धारवाडकर
17. जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवर परिणाम — 55
प्रा. डॉ. बी. एस. मुजमुले
18. जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम — 58
प्रा. एन.आर. हुरगुळे
19. भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने — 60
प्रा. के.जे. खंदारे
20. 'दहशतवाद' – भारतासमोरील आव्हान — ६२
प्रा. रामप्रसाद व्हडगीर

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

# जागतिकीकरण आणि दारिद्र्य : एक अभ्यास

**संशोधक**
**दलित सुभाषराव कांबळे**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**मार्गदर्शक**
**प्रा.डॉ. दिपक धारवाडकर**
समाजशास्त्र विभागप्रमुख तौष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव

---

**प्रस्तावना**

मानवाच्या इतिहासावर नजर टाकल्यास मनुष्य हा एक रानटी प्राण्याप्रमाणेच जिवन जगत असल्याचे दिसून येते. तो प्राण्याप्रमाणेच जंगलामध्ये वास्तव करत असायचा, शिकार करून सुरूवातील कच्चे मास खाऊन आपली उपजिविका भागवायचा. तर शरीर झाकण्यासाठी झाडांच्या फांद्या वापरायचा. परंतु काळानूसार मानवाचा जसजसा विकास होवू लागला तसतश्या मानवाच्या गरजा बदलत गेल्या. शिकारीतून मिळालेल्या कच्चे मास, कंदमुळे आणि फळ यावर आपली उपजीविका भागविण्यासाठी अवलंबून न राहता धान्य पिकवू लागला. पूर्वी शरीर झाकण्यासाठी झाडांच्या फांद्या व जनावराची कातडी यांच्या ऐवजी वस्त्राची निर्मिती करू लागला. म्हणजेच मानवाच्या विकासाबरोबर त्यांच्या गरजा वाढत गेल्या. त्या पूर्ण करण्यासाठी तो इतरांवर अवलंबून राहू लागला. त्यातूनच वस्तू विनिमय पध्दती उदयास आली. म्हणजे मनुष्याच्या अनंत गरजा व अपूरी साधने आणि कौशल्य यांच्या माध्यमातून मनुष्य परावलंबी बनला आणि बाराबलुतेदारी पध्दती मधून आपल्या गरजा भागवू लागला. म्हणजेच कोणताच मनुष्य स्वत:च्या गरजा, अपुरा वेळ आणि कौशल्याचा अभावामुळे पूर्ण करू शकत नाही. म्हणून एकमेकांना मदत करून आपल्या गरजा पूर्ण करू लागला. यावरून असे स्पष्ट होते की, समुहातील वा गावातील प्रत्येक व्यक्ती इतर कोणत्याही व्यक्तीकडून आपल्या गरजा भागविण्यासाठी वस्तूंची वा सेवांच्या बदल्यात आपल्या गरजा पूर्ण करू लागला. परंतु जसजसा काळ बदलत गेला तसतसा व्यक्तीचा विकास होत गेला आणि वाढत्या विकासाबरोबरच व्यक्तीच्या गरज वाढत गेल्या. पूर्वी ज्या गरजा आपल्या समुह, गाव, राज्य व देशात भागविल्या जात होत्या त्या आज देशात भागविणे अशक्य झाले म्हणून आपल्या गरजा भागविण्यासाठी इतर देशावर वा देशातील व्यक्तीवर अवलंबून राहू लागला. परिणामी जगातील कोणत्याही व्यक्ती वा वस्तू विनिमयामधून आपल्या गरजा पूर्ण व्हाव्यात या उद्देशातून देशादेशामध्ये वस्तू सेवांची देवाण–घेवाण करण्याची जी प्रक्रिया सुरु करण्यात आली यालाच जागतिकीकरण असे म्हणता येईल.

जागतिकीकरण ही सद्यकालीन प्रक्रिया असून ती जगामध्ये सर्वत्र सुरू झाली आहे. औद्योगिकरणाच्या प्रक्रियाची सुधारित व विस्तारीत रूप म्हणजेच जागतिकीकरण होय. 1980 नंतर इंग्लंड, फान्स, रशिया, ऑस्ट्रेलिया या देशाच्या पुर्नरचनेचे वा आर्थिक सुधारणेचे जे कार्यक्रम सुरू झालेत. त्यातूनच जागतिकीकरणाला सुरूवात झाली आहे. जागतिकीकरण ही संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ वा आर्थिक प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. परंतु या प्रक्रियेमुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक असे अनेक पैलू प्रभावित होतात. म्हणून ही एक सर्वस्पर्शी प्रक्रिया आहे. परंतु या प्रक्रियेचा वस्तूनिष्ठ अभ्यास करता यावा या उद्देशाने सामाजिक पैलूंवर भर देवून जागतिकीकरण व दारिद्र्य या लघुशोधनिबंधाची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन विषयाचे उद्देश:–**

1) जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेणे.
2) दारिद्र्याचा अर्थ जाणून घेणे.
3) जागतिकीकरणामुळे दारिद्र्य कसे वाढले आहे ते अभ्यासणे.

**गृहितके:–**

1) जागतिकीरणाचे समाजावर अनुकूल आणि प्रतिकुल परिणाम दिसून येतो .

**संशोधन पध्दती:–**

प्रस्तूत शोधनिबंध प्रामुख्याने दुय्यम साधनसामुग्रीवर आधारलेला असून तथ्य संकलनासाठी विविध संदर्भग्रंथ, वर्तमानपत्र मासिके, संकेतस्थळे इ. चा आधार घेण्यात आला आहे.

**जागतिकीकरणाचा अर्थ:–**

जागतिकीकरण ही एक व्यापक आणि जटील स्वरूपाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे जग लहान झाले आहे. 'वसुदैव कुटूंबकम', 'हे विश्वची माझे घर' या संकल्पनाप्रमाणे जागतिकीरणामुळे जगाचे स्वरूप खुपच लहान झाले आहे. संचारमाध्यमे साधने, दळणवळण, तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे यामुळे जगातील सर्वच सीमा नष्ट झाल्याचे अनुभव घेत आहेत. जग जवळ आल्याचे अनुभव येत आहेत. जगाच्या कोणत्याही काण्याकोपऱ्यात घडलेल्या घटनेचा प्रभाव एका क्षणात दुसऱ्यावर पडत आहे ते जागतिकीकरणामुळेच.

जागतिकीकरणासंबंधी उत्तम कांबळे असे म्हणतात की, "जागतिकीकरण हा सर्वांना बऱ्या वाईट पध्दतीने व्यापणारा गुंतागुंतीचा आणि व्यापक विषय आहे. पूर्वी पृथ्वी शेषनागाच्या फडीवर उभी होती असे म्हणत असत. परंतु अण्णाभाऊ साठेच्या शब्दात ती श्रमिकांच्या तळहातावर उभी आहे. परंतु आज जर मुलाला विचारले तर तो म्हणेल ही पृथ्वी संगणकाच्या पडद्यावर उभी आहे." एवढे तंत्रज्ञान जनमानसात लोकप्रिय झाले असून मानवी जीवनाचे अविभाज्य अंग बनले आहे. एकूणच जागतिकीकरण ही एक प्रक्रिया असून यामध्ये जग जवळ येवून व्यापार, देवाण–घेवाण, मुक्त व खुले बाजार व्यवस्था यांचा समावेश होतो.

जागतिकीकरणाचा सखोल अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, या प्रक्रियेतून एक नवी समाजव्यवस्था, माहिती तंत्रज्ञान, खुली स्पर्धा, मुक्त बाजारपेठ, मुक्त जीवन प्रणाली यातून आधुनिक जीवन संस्कृतिचा उदय झाला आहे. यातून आपण एका देशाचे नागरीक नसून संपूर्ण जागचे नागरीक आहोत अशी भावना निर्माण होते.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

दारिद्र्याचा अर्थः—

'दारिद्र्य' ही संकल्पना स्थळ व काळ सापेक्ष असल्यामुळे तिची सर्वमान्य अशी व्याख्या करणे कठीण आहे. त्यामुळेच 'दारिद्र्य' या संकल्पनेविषयी विचारवंतामध्ये एकमत असलेले दिसून येत नाही.

समाजातील प्रत्येक व्यक्तीला जिवन जगण्यासाठी मुलभूत गरजांची पूर्ती करणे आवश्यक आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजा बरोबरच मोटार, स्कुटर, फ्रीज, टि.व्ही., भ्रमणध्वनी यासारख्या वस्तूंची आवशकता आहे. परंतु स्वतः व्यक्ती आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या या आवश्यक गरजांची पूर्ती होत नाही. तेव्हा ती व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीचा जीवन स्तर न्यूनतम जीवन स्तरापेक्षा खाली असतो तेव्हा त्या अवस्थेस 'दारिद्र्य' असे म्हणतात.

अमर्त्य सेन यांच्या मते, ''दारिद्र्य म्हणजे समाजातील इतरांपेक्षा जास्त गरीब असणे असा अर्थ नाही तर दारिद्र्य म्हणजे ऐहिक सुखसोई मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान संधी न मिळणे आणि काही किमान गोष्टी मिळविण्यासाठी असलेली असमर्थता होय.''

**जागतिकीकरण आणि दारिद्र्यः—**

जागतिकीकरणा अंतर्गत विविध प्रकारच्या वस्तू, तंत्र—माहिती, ज्ञान, विचार, आचार, सांस्कृतिक मूल्ये इ. बाबींचा समावेश झालेला असतो. ज्या एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणावर प्रवाहीत होत असतात. त्यामुळे प्रत्येक देशातील समाजरचनेत प्रचंड प्रमाणात परिवर्तन घडून येत आहे. नवनविन तंत्रज्ञानामुळे जग लहान होत चालले आहे. जग कुटूंबासारखे परस्परांच्या जवळ येत आहे, व्यक्ती देशातील मतभेद वा शत्रुत्व विसरून वस्तूंची देवाण—घेवाण करत आहेत. रेडिओ, वर्तमानपत्र, मासिके, पुस्तके नि दुरदर्शन यासारख्या माध्यमांची जागा इंटरनेट आणि तत्सम साधनांनी घेण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे हजारो किलोमीटरवर असलेला व्यक्ती तिच्या कुटूंबियांशी इंटरनेटच्या सुविधेमुळे प्रत्यक्ष बोलू व दिसू लागला आहे. मोबाईलच्या साह्याने जगातील कोणत्याही खेड्यातील आप्त स्वकीयांशी बोलू लागला आहे. हा सर्व परिणाम जागतिकीकरणाचाच आहे. यावरुन जागतिकीकरणामुळे जग जवळ येवून सलोख्याने राहतांना व विकास करतांना दिसून येते आहे तर दुसरीकडे अनेक सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण होत आहेत. त्यामध्ये वस्तूनिष्ठ अभ्यास करता यावा या उद्देशातून एकीकडे विकासास हातभार लावणारे जागतिकीकरण दारिद्र्यास कस कारणीभूत आहे याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न या ठिकाणावर घेण्यात आला आहे.

जागतिकीकरणापूर्वी भारतामध्ये लघू व कुटीर उद्योगावर व्यक्ती आपल्या उपजिविका भागवत असत. त्यामुळे समाजातील कोणत्याच व्यक्तीला बेकार वा बेरोजगारीला सामोरे जावे लागत नसे. प्रत्येकाला लघू व कुटीर उद्योगातून काम मिळत असल्यामुळे आर्थिक बाबीवर तफावत आढळून येत नव्हती. परंतु जागतिकीकरणाच्या नवीन आर्थिक धोरणामुळे उद्योग, व्यापार, दळणवळण व माहिती तंत्रज्ञान ही उत्पादनाची क्षेत्रे भांडवलदाराच्या सत्तेखाली आलेली आहेत. या भांडवलदारांनी त्यांच्याकडे असलेल्या अफाट आर्थिक ताकदीवर नवनवीन उद्योगधंदे निर्माण केले आहेत. त्यामुळे कुटीर उद्योग संपुष्टात आले. परिणामी बेकारी व गरीबी या समस्या निर्माण झाल्या आहेत.

जागतिकीकरणाची प्रक्रिया भांडवलशाही विकासाला अधिक पोषक ठरली आहे. या प्रक्रियेमधून भांडवलावर मालकी असणारा भांडवलदार भांडवलाचा अभाव असलेला किंवा भांडवलावर मालकी नसलेला श्रमिक अशा दोन वर्गामध्ये समाज विभागला गेला. भांडवलदार आपल्या अधिकाराच्या आधारे जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करू लागला. जास्त नफा मिळविण्यासाठी तो श्रमिकांकडून कमी मोबदल्यामध्ये जास्त काम घेवून त्यांचे शोषण करू लागला आहे.

जागतिकीकरणामुळे उद्योगधंदयाची संख्या मोठ्या प्रमाणामध्ये वाढविण्यात आली आहे. परंतु उद्योगधंदयामध्ये काम करण्यासाठी यांत्रिक ज्ञान असलेल्या कुशल कामगारांची आवश्यकता आहे. परंतु उच्च व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी लागणारा खर्च करण्याची क्षमता गरीब वर्गाकडे नसल्यामुळे त्यांना अकूशल कामगार म्हणून कमी वेतनावर काम करावे लागते. परिणामी त्यांना गरीब परिस्थितीला सामोरे जावे लागते. याउलट श्रीमंताची मुले महागडे उच्च व्यावसायिक शिक्षण घेवून वेगवेगळ्या उद्योगधंदयामध्ये नोकरी प्राप्त करतात. अशा परिस्थितीमुळे श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब गरीबच बनत चालला आहे. ही आर्थिक विषमतेची परिस्थिती देशाची अर्थव्यवस्था अस्थिर करून गरीब व श्रीमंत यांच्यामधील सामाजिक व आर्थिक अंतर वाढवणारी आहे आणि त्यासाठी जागतिकीकरणच जबाबदार आहे.

अनेक देशातील कंपन्यांनी वेगवेगळ्या उद्योगधंदयामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि यंत्राचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे. त्यामुळे जे काम करण्यासाठी अनेक मजूर लागत होते ते काम आज एकच मजूर यंत्राच्या साह्याने करू लागला आहे. परिणामी अनेक कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. तसेच मोठमोठ्या कंपन्यांनी जाहिरातीच्या माध्यमातून आपल्या उत्पादीत वस्तू, मालाला जागतिक बाजारपेठ मिळवून दिल आहे. तर याउलट छोट्या उद्योगधंदयातून उत्पादी होणाऱ्या वस्तूंना योग्य बाजारपेठ न मिळाल्यामुळे लहान उद्योग बंद पडून त्यातील कामगारांवर बेकारी व उपासमारीची वेळ आली आहे.

वाढती लोकसंख्या व बेरोजगारीवर मात करण्यासाठी रोजगाराच्या उद्देशाने विविध प्रकारचे कौशल्यपूर्ण शिक्षण घेतलेला मोठा वर्ग निर्माण झाला आहे. वाढता कुशल श्रमिक वर्ग आणि वाढती लोकसंख्या ही भांडवलशाही विकासाचे मुख्य कारण आहे. कार्ल मार्क्स म्हणतात त्याप्रमाणे भांडवलदारांच्या मागणीपेक्षा कामगारांचा पुरवठा अधिक असेल तर ती परिस्थिती [illegible] शोषणाला जबाबदार ठरते. त्याचप्रमाणे वाढत्या श्रमिक संख्येमुळे कमी वेतनामध्ये प्रचंड वस्तूचे उत्पादन [illegible] अधिक नफा मिळविला जात आहे. म्हणूनच श्रमिकांच्या शोषणातून भांडवलशाही अधिक बळकट करण्याचे काम जागतिकीकरणातून झालेले दिसून येते.

भारताने स्वातंत्र्यानंतर मानवतावादी दृष्टीकोणातून समाजवादी व मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला होता. त्यातून भारताचा आर्थिक विकास फारशा प्रमाणात झाला नसला तरी दुर्बल घटकांना सबल करण्याचे कार्य पूर्ण केले होते. परंतु 1991 च्या जगातिक आर्थिक धोरणामुळे दुर्बलांचा विकास साधणाऱ्या समाजवादी धोरणाचा त्याग करून भांडवल असलेल्या [illegible] लोकांचा विकास करण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे सर्वांचे 'कल्याण' या उदात्त मूल्याचे अवमुल्यन करून प्रचंड भांडवल असलेल्या भांडवलदारांचे कल्याण साधणाऱ्या या नव्या धोरणांचा स्विकार जागतिकीकरणातून केला गेला. त्यामुळे जगातिकीकरणातून रोजगाराच्या संधीची प्रचंड उपलब्धता करून दारिद्र्य हटविण्याचा उद्देश अयशस्वी ठरत चालला आहे.

जगतिकीकरणाच्या धोरणामुळे सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण केले जात आहे. कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक, कामगार कपात, पेन्शन बंदी, सरकारी स्वस्त धान्य दुकान, गॅस, डिझेल, पेट्रोल, खते, बि–बियाणे, आरोग्य, पाणीपुरवठा, विजपुरवठा इ. वरील अनुदानातील कपातीमुळे गरीबांच्या विकासाला खीळ बसली आहे. तर दुसरीकडे जागतिकीकरणाच्या प्रभावातून सहकार्य, मानवता, सदाचार, त्याग, नैतिकता, चारित्र्य, संयम, दया, क्षमा, शांती इ. मुल्यांचा ऱ्हास होत आहे. या मुल्यांवर भारती समाजाची इमारत उभी होती. या मुल्यांचे संरक्षण व संवर्धन करून समाजात एकता टिकवून ठेवण्याचे काम संत–महतांनी केले होते. परंतु जागतिकीकरणातील स्वार्थी व्यक्तीवादी वृत्तीमुळे त्यांचा ऱ्हास झाला आहे.

जगतिकीकरणाच्या नव्या आर्थिक धोरणामुळे भारतीय व इतर राष्ट्रीय कंपन्यांनी आदिवासीच्या जंगली व खनिज संपत्तीची लूट केली आहे. जंगलातील फळे, कंदमुळे, शिकार, पशुपालन, शेती ही जगण्याची क्षेत्र हिरावून घेवून त्याच्यापुढे जीवनमरणाचा प्रश्न निर्माण केला आहे. खाजगीकरणाच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रात नवनविन उद्योगधंदे उभारून आदिवासींचे शोषण केले जात आहे. ओरिसा राज्यात तेंदूची पाने आदिवासी गोळा करतात. त्यावर 12 रू. सरकार कर लावते. त्यामुळे फक्त 4 रू. प्रतीटन आदिवासींच्या पदरात पडतात. तसेच बॉक्साईट खाणीतून बॉक्साईड काढले जाते. यावर सरकार प्रतिटन रू. 30 रू. रॉयल्टी घेते. त्यामुळे त्यांचा फायदा खाणमालकाला होतो. अशाप्रकारे सभ्य समाजाबरोबरच आदिवासीच्या आर्थिक शोषणाचे कारणसुध्दा जागतिकीकरणच ठरत आहे हे सत्य आहे.

**निष्कर्ष:–**

जागतिकीरण आणि दारिद्र्य या विषयाशी संबंधीत असलेल्या माहितीच्या विश्लेषणातून खालील निष्कर्ष आढळून आले.

1) कारखानदारीतून / भांडवलशाहीतून श्रमिकांचे शोषण करण्यात आले आहे.
2) नवीन आर्थिक धोरणामुळे दूर्बल घटकांच्या 'कल्याण' ऐवजी भांडवलदारांचे कल्याण झाले आहे.
3) सहकार्य, सहिष्णूता, त्याग, मानवता या मुल्याचा ऱ्हास झाला आहे.
4) सभ्य समाजाबरोबर आदिवासी समाजाचे शोषण करण्यात आले आहे.

**संदर्भग्रंथ:–**

1) ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या:– डॉ. दा.धो. काचोळे, कैलाश पब्लिकेशन्स, गोकुळवाडी, औरंगपुरा, औरंगाबाद.
2) जागतिकीकरण : भारतासमोरील आव्हाने – प्रा. कराडे, जगन (संपादक), डायमंड पब्लिकेशन पुणे.
3) सामान्य अध्ययन, स्टडी सर्कल पब्लिकेशन, मुंबई
4) जागतिकीकरण शाप नव्हे वरदान – गायवकवाड मुकुंद, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
5) जागतिकीकरण : नवीन गुलामगिरी – भागवत विष्णू, समता प्रकाशन, नागपूर.